पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक १९.११.२०१८

# वार्तापत्र

## पोलीस माओवादी चकमकीत २ माओवादी ठार

मा. अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. डॉ. हरी बालाजी यांच्या मागदर्शन व नेतृत्वाखाली विशेष अभियान पथकाचे जवान तसेच सिआरपीएफ १९२ बटालियन यंग प्लाटुनचे जवान पोमकें गॅरापत्ती अंतर्गत येत असलेल्या मौजा निहायकल जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना आज सकाळी ०८.३० ते ०९.०० वा. चे सुमारास दबा धरून बसलेल्या माओवाद्यांनी पोलीस पथकावर त्यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने अंदाधुंद गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल व स्वसंरक्षणार्थ पोलीसांनी माओवाद्यांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. माओवाद्यांच्या गोळीबारास न जूमानता पोलीस पथक आगेकुच करत असतांना पोलीसांचा वाढता दवाब पाहुन माओवाद्यांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

यानंतर सदर ठिकाणी शोध मोहिम राबविली असता हिरवे काळे रंगाच्या गणवेश घातलेल्या ०२ महिला माओवादी निपचीत अवस्थेत आढळुन आले. त्यापैकी ०1 महिला माओवादीची ओळख पटली असुन तिचे नाव बबिता नरसु गावडे उर्फ शांताबाई बारसू नैताम, वय अंदाजे २८ वर्षे, रा. फुलकोडो ता. धानोरा असुन ती प्लाटुन क्र. १५ मध्ये सदस्य म्हणून कार्यरत होती. तिचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोस्टे अंतर्गत १६ गुन्हे दाखल आहेत. तसेच तिचेवर महाराष्ट्र शासनाने चार लाख रूपयांचे बक्षीस जाहीर केले होते. दुसऱ्या अनोळखी मृत माओवादीची ओळख पटविण्याचे काम सुरु असुन चकमकीनंतर सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी शोध मोहीम राबविण्यात येत आहे.